म. ग्रं. सं. ठाणे
विषय काव्य
सं. क्र. २९९६



# वसंत सावंत

# ास्तिक

REFBK-0018846
REFBK-0018846

२११६

# नवे कवी
# नवी कविता ५

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क.
९८७४६

१

**ग्रेस**

संध्याकाळच्या कविता

२

**ना. धों. महानोर**

रानातल्या कविता

३

**अनुराधा पोतदार**

आवर्त

४

**शंकर वैद्य**

कालस्वर

५

**वसंत सावंत**

स्वस्तिक

२००५ ... अनुक्र
2996 ... 24/5/314

# स्वस्तिक

वसंत सावंत

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ९८८७५
संग्रह शाखा (स्थळ प्रत)

REFBK-0018846
REFBK-0018846

पॉप्युलर प्रकाशन, मुंबई

© वसंत सावंत
श्री पंचम खेमराज महाविद्यालय, सावंतवाडी, जि. रत्नागिरी, महाराष्ट्र

पहिली आवृत्ती : १९७३/१८९४

मुखपृष्ठ : पद्मा सहस्रबुद्धे

मुद्रक : वि. पु. भागवत, मौज प्रिंटिंग ब्यूरो, खटाववाडी, गिरगाव, मुंबई ४
प्रकाशक : रामदास भटकळ, पॉप्युलर प्रकाशन, ३५ सी ताडदेव रोड, मुंबई ३४

तीर्थरूप रा. रा. आबासाहेब
आणि सौभाग्यवती आईस,
तुमच्या गळ्यांत कोंदलेल्या
विठूच्या अभंगाची
आणि ओवीची लय
'स्वस्तिक'मध्येंहि उतरूं दे!

आभार : श्री. रामदास भटकळ, प्रा. रमेश तेंडुलकर
मौजेचे भागवतबंधू, श्री. राम पटवर्धन, प्रा. अनंत काणेकर
सौ. शिरीष पै, श्री. मनोहर नाईक आणि माझ्या कवितेवर
प्रेम करणाऱ्या सर्वांचे...

# अनुक्रमणिका


स्वस्तिक १०
तिनें मला पाहिलें १२
मनामनाला देह नवे १३
प्रश्न तुझे : उत्तर मी १४
जाण १७
पाठमोरी १८
एक मुलगी १९
फिका चंद्रमा भरला सागर १९
तुझी लाभली ना घनाकार छाया २०
जन्मजोग २१
कालच या वाटेवर २२
दीपच झाकूं लागतात प्रकाश २३
आणि धुमसत्या प्रश्नांना २४
करार २५
फुलें फुलें २५
चंद्रबिंब २६
काळोखांत बोलतांना २६
श्रीरंग २७
भिजत राहते रात्र २८
चित्र २९
निळें शिल्प ३०
गर्द धुक्याच्या राती ३१
चांदण्यांत सुरूचें झाड अंगावर
कोसळावें ३२
धुकें ३३
शब्दांत पकडतां येत नाहीं ३४
लवत लवत घन ३६
झाडें पेटुन धुकें राहिलें ३७
रंगारी ३८
सायंकाळ ३९
चंद्रवेळ झावळांत ४०
मृग ४१
मुक्या जंगलांतून जातांना ४२
कविता ४४

दयामूर्त आकाश ४५
वळणावरती वळण ४६
साथी ४७
सर्कस ४८
मिठी ४९
अकल्पीत यात्रेंतला मी प्रवासी ५०
टिळा लाव माझ्या जुन्या अक्षरां ५१
तूं निवारा ५२
मना नच भय ५३
खूण ५४
पुष्कळाची वाट ५५
वाट ५६
दुःख ५७
दासांच्या पादुका नेतांना ५८
माझे हंबरले प्राण ५९
बैल ६०
अंबादर्शन ६१
अजिंठा ६२
ही जागा ६३
केशवसुतांना ६४
कृष्णा गोसावी ६५
तो ६६
कधीं कधीं ६७
जुगार ६९
परमेश्वरानें मला दिलेलें मन ७०
चुकल्या क्षणांची किंमत ७१
जन्मवाद ७२
जिथें मी जीव लावला ७३
दैवें भेट घडावी ७४
मीं सुखाला पाहिलें कीं ७५
जाच ७६
भुतें ७७
तो एक आणि तो एक ७८

तुझ्यासाठीं थांबलों आहें असा या अंधारांत
सभोंवती थडथडती वादळें अजून
निरंतर समईची ज्योत लाव माझ्या घरांत
श्रमंती मिटली नाही माझी अजून
आयुष्य वाटलें मीं अक्षरांना; अजूनही वाटतों आहें
त्यांच्या दिठीचा फुलवा तुझा:
मी म्हणणार नाहीं माझें कांहीं
फक्त स्वस्तिक रेख भाळावर प्रीती म्हणून

## स्वस्तिक

१.

रंगमोर आठवणी तुझ्या इथल्याइथेंच नाचत असतात
आकाश पाहण्याचें आहे वेड पण पावलें मातीवरच खिळतात
शिस्तबद्ध झाडांचे थवे कसे ओळींनें रांगोळीसारखे
याच झाडांतून आली होतीस ओळखींचे चेहरेंहि करीत पारखे
उभे रस्त्यांतून स्मृतींचे माग सरळसोट उभे वाढतच
कढत कढत लाव्हामय श्वास पानें भाजीत मनें पोळतच
तडकते झोप उत्तररात्रीं आणि जाग जागीच राही
भोंवतालीं झोपलेलें जग त्याला माझी किंमत नाहीं
कसे सरकतात तंद्रींतून जीवनाचे चंद्रभास डोळयांपुढून
पुढ्यांत कुणी आलें तर सावल्याच लक्षांत रहातात नांवें गळून...

२.

काल तमांतून चांदण्या आल्या नि मनावर सावल्या कोरून गेल्या
एक तुझी...एक माझी...एक त्याची...साऱ्यांच्याच उल्का झाल्या
एक गायला न येणारी मुलगी आली आणि माझीं गाणीं मागूं लागली
नाहीं म्हणतांच मुकी होऊन आल्या वाटेनें जाऊं लागली
निःस्तब्ध रात्रीं वाटतें तिची छायाच हलते आहे सभोवार मनातळीं
आणि पिंगा घालतात गाण्याआधीं कवितेच्या खऱ्या ओळी
काल तमांतून चांदण्या आल्या नि मनावर सावल्या कोरून गेल्या
कानांवर कंकणांचा किरमिजी आवाज आला त्यानेंच सनई वाजूं लागल्या
फुलें विकलीं हारासाठीं गीत गौरीहर झालें तेव्हां
ताम्हनांत भरली घटिका स्वस्तिक फुलांनीं डंवरलें जेव्हां...

३.

दुर्दैव पांघरून जन्म घेतात स्वप्नें विनाशी वाटांनीं; तूंही तसेंच केलेंस...
दूरवर मैदान न्याहाळणारे तुझे डोळे मी खेळतांना माझ्यावरच खिळले
आणि डोळ्यांना डोळे द्यायची वेळ आली तेव्हां बुजून खिडकीआड लपविलेस; संयमानें;
कशी मुकी जळलीस वेदनांनीं; भिंतीवरच अश्रूंनीं स्वस्तिकें कोरलींस
त्या विरल्या श्वासांचा आवाज तुझ्या ऐकला मीं माझ्या हुंदक्यांनी

तुझ्याच दयाघनांची छाया माझें चांगुलपण—त्यावरच कैक खेळ जिंकले मीं
जिद्द तुझी; तुझ्या व्यक्तित्वाची; तुझ्यामुळेंच हरतांनाही मी जिद्दीनें हरलों !
कसे धांव धांव धांवलों; वाटा नवीनच उलगडल्या मैदानानंतर
काळोख झाला की पळायचीस देवापुढे निरांजन लावण्यासाठीं फुलवातीसारखी
आजही मावळलें कीं वाटूं लागतें इथें एक फुलवात फुलते आहे तुझ्यासारखी...

४.

चित्रविचित्र काळोख; नितळ रस्ते; शाईनें ओळ काढावे तसे; दिवे दुतर्फा
खदखदून विश्रान्त दर्या माझ्यासारखा; क्षितिजाशीं उभी काजळरेखा
उमलतें चंद्राचें फूल पूर्वेच्या डोई...सावल्यांना चंद्रगीताची घाई
विषिण्ण सूर सुरूंच्या झाडांतून पेंगुळतें चांदणें मथवलें जाऊन आपोआप
एक मोटार भारल्या उराची धावत जाते डोळ्यांच्या पार...दूर दिव्यांची माळ
कसा हंसत असूनही दुखरा किनारा; पायांना खोल डोहाहून वाटे तळ
मी तुला विसरलों नाहीं...कधीं विसरूं शकत नाहीं...हाच झाला आहे गुन्हा
तुला पाहिलें आणि असा झालों कसा तें सांगतांच येत नाहीं मला
अगम्य मी माझा असा एखादी संध्याकाळ या चुरडलेल्या स्वस्तिकांच्या पायघड्यांवरून
भोंवताली चित्रविचित्र काळोख...नितळ रस्ते; शाईनें ओळ काढावे तसे; दिवे दुतर्फा...

मुंबई, २९-११-६२

## तिनें मला पाहिलें

तिनें मला पाहिलें
मीं तिला पाहिलें :

कुणीतरी एकच क्षण
फूलगीत गायिलें

तिनें मला पाहिलें
मीं तिला पाहिलें :

फांदिविणा उंबराला
फूल झुलूं लागलें

तिनें मला पाहिलें
मीं तिला पाहिलें :

दंवादंवांत ऊन भिजून
लाजूं लवूं लागलें...

मुंबई, १२-१०-६०

## मनामनाला देह नवे

प्रकाश माझे प्राण परंतु देहफुलाचा सूर्य जळे
ओठांमधली आग अगांतुक फुलवित येते अग्निकळे
विडा विरघळे मुखांत आणि स्वप्न चाखिते रसगंगा
प्रकाशतीर्थावरी उतरलों प्रयाग माझें मज दिसतां
डुलत चालतां सहज फुलांवर ठेवुनियां तूं गालठसे
चुंबियले मीं वक्षतिठ्यावर तव स्वप्नांचे गर्भससे
डोळ्यांमधुनी घळलें अंबर प्रकाश पिकला निळानिळा
अंग, अंग लवलवलें अस्तर मखमल्ली देहांत शिळा
मखमल्ली देहांत शिळा अन् प्रकाश झाले प्राणथवे
गर्भांमधुनी फुले प्रकाशच मनामनाला देह नवे

मुंबई, २५-१-६१

## प्रश्न तुझे : उत्तर मी

सरळ सरळ सांग मला
'प्रीत तुझी माझ्यावर...,
नाटक कां करिशि असें
नट मी पण ; नटल्यावर

प्रश्न तुझे : उत्तर मी–
सर्व वह्या, पेन नवें,
नव पुस्तक, गीत नवें,
गुणगौरव झालेले
पेपरगुण
सर्व हवें सर्व हवें तुज आणिक
जुळणारी खूण हवी
पळणाऱ्या ओळींतुन...

प्रश्न तुझे : उत्तर मी
सरळ सरळ सांग मला
'प्रीत तुझी माझ्यावर...'
नाटक कां करिशि असें
नट मी पण ;.नटल्यावर

सांगितलें कुणि तुजला
पांघरून वेड असें
मी फसेन?
तुज कळतें...नच वळतें
मज कळतें...पण तुटतें

विश्वाच्या पिंजऱ्यांत मी बंदी
मज छळिते एक कुणी
स्वरराधा–

जी पहांट नेसुनियां
हंसली त्या नाट्यगृहीं
'अभिनंदन...अभिनंदन
छान...छान...काम किती...'

ओळख केली बुजरी
पण रुतली गुप्त उरीं माझ्या कां?
आठवतो मज तेव्हां
चंचलरव हुकलेला
एका अस्फूट क्षणीं
बावरून दोघेंही धांदलींत...
तदनंतर माळुनियां
शुभ्र फुलांचा गजरा
कलली ती स्कंधावर

पण चुकून; छे! विश्वास नसे

कुजबुजले मित्र मला
कुजबुजली तिज मैत्रिण
कुजबुजले क्षण सारे
कुजबुजला आत्मा तिज

मोहरली मग कां ती?
मोहरलें कां अंबर
रुमझुमले स्वर कानीं
पायांतिल नुपुराविण

फुलली ती मजसाठीं
क्षण एकच...छे अनेक
विजयाचा मी स्वामी
विश्व तिचें मी कौतुक

स्वप्निल झाल्या नजरा
प्रज्ञेचे कण लुटतां
जळलों
जुळलों अनभिज्ञपणें
तुटतां तुटतां...हसतां

प्रश्न तुझे : उत्तर मी
सरळ सरळ सांग मला
'प्रीत तुझी माझ्यावर...'
नाटक कां करिशि असें
नट मी पण ; नटल्यावर

नश्वर नश्वर नखरा
प्रीत हवी शाश्वत मज
विजयाचे क्षण माझ्या
केव्हांही भेट तिला—
फक्त हवी मज मृदुला
गुरफटली जी स्वरांत
स्वर माझें जीवन जे—
प्रश्न तुझे : उत्तर मी
सरळ सरळ सांग मला

मुंबई, २४-८-५९

## जाण

कळूं लागलें मला
    पळूं लागलें मी
छळूं लागली धूळ
    तिला वारेखूळ
पिळूं लागतां मध
    उडूं लागे माशी
कशी अडवूं आतां
    भिरी गगनपिशी...

मुंबई, १०-२-६१

## पाठमोरी

अनंत अनिर्बंध आकाशांचे आकार सरकतात
पाठमोरी...
छबिल्या गीताच्या ओळी गुणगुणत
तूं चालतेस तेव्हां
तुला माहित नसतें
तुझ्यामागून अदृश्य पावलांनीं मी चालत असतों
तुझ्या मंद पावलांच्या लयींनी
देहाचा पद्मबंध तोलून धरलेला
मनांतल्या सुगंधी स्वप्नांचा तो आकाशझुला
इंद्रधनूंच्या रंगमय रेषांनीं विणलेला
कुठून आणूं हें पहायला ईश्वरानें हरविलेले डोळे
अनंत अनिर्बंध आकाशांचे घाटदार आकार तेवढे सरकतात
रंगलक्षी मनाच्या पडद्यावरून...

मुंबई, ऑगस्ट ६२

## एक मुलगी

एक मुलगी गुणगुणत गुणगुणत येते आहे
तिला कसें म्हणूं मी तुझें-माझें नातें आहे...

एप्रिल, ६२

## फिका चंद्रमा भरला सागर

फिका चंद्रमा भरला सागर उरलों दोघें कांठा
जीवनतारूं तुझ्याच हातीं दहिंवरलेल्या वाटा
भिडुन तुझा कर या खांद्यावर भरली ओंजळ रिती
किती सांगशी दुःख साजणे, माझी रिती भ्रमंती
निर्मल डोळे घनांत काळे रंग अनोखे आले
फिरली पृथ्वी विशाल जीवन तुझें नि माझें झालें

सावंतवाडी, २१-१०-६४

# तुझी लाभली ना घनाकार छाया

तुझी लाभली ना घनाकार छाया
तरी गंध सौगंध ना थोडका
उरीं आज माझ्या फुले चांदणी ही
नभींची फ़िकी त्यापुढें चंद्रिका

पुढें धांवतों मी पुढें धांवण्याचें
असें वेड माझें जरी पोरकें
नभांची कुरोंडी करूनी क्षणीं मी
झणीं फेकितों आज हीं कौतुकें

मला आज नाही व्यथेच्या तमाचें
महापाश टाकी असें बंधन
इथें गीत ओठीं स्फुरावें झुलावें
करी दुःखदर्या सुखें मंथन

तुझा गंध प्यालों विजेच्या गतीने
पुरा धुंद बेबंद मी हा असा
तुझ्या घट्ट पाशांत वाटे लुटावी
झुरी सौरभाची गुलाबी नशा

तुझी लाभली ना घनाकार छाया
क्षणानें मला त्वां दिलें जें धन
युगींचें मला तूं हिरावून नेलें
नि आशेंत मुग्धे, विरे तें ऋण

नभांनीं झुरावें अशा या क्षणांना
जयांच्या न मोलास लागे तुला
दिशांनी दळावें फुलांनीं फुलावें
असें कांहि तूं दान केलें मला

मुंबई, १९५७

## जन्मजोग

चिंतनीं निमग्न मी निमग्न रात्र भोंवतीं
दुरांत चांदण्या फिक्या प्रकाश दूर क्रूरसा
भरून ऊर दाटतो तमांत मी भ्रमें पिसा
तुझा तूंच—तूं तुझाच—कळत जाय शेवटीं

कुणामुळे घडे असें कुणास दोष द्यायचा
गिळून काजवे फिके निळा प्रकाश प्यायचा
अनंत सावल्या मनीं कुठें न आढळे दिवा
मुक्यामुक्याच कल्पना तळांत कांपरी हवा

घनांध मस्तली धरा पेटली उरांतुनी
कटींतली उटी तिच्या दर्वळे दिशांतुनी
निवांत अंतहीन मी तुला कधीं न सापडे
क्षितीज लाजरें कुशींत आंत आंत कोंदलें

दुरून साद घालितो कुणी अगम्य आगळा
धुकें मनांत दाटतें दडून चांद केवडा
पिळून प्रश्न मंथितां गढूळ अर्थ मावळे
कशी तुझ्यांत मग्न तूं दिठींत रक्त सांकळे

कोसळे दिशादिशा भरून चाललीं नभें
भेटलीं भरांत आज जन्मजोग पांखरें
धार धार नाचते नळ्यांत ताल वाजतो
तुझ्यांत मी तुझा तुझा भरांत साद घालितों

तुला कुठें कळे परी तूं दिगंत-बावरी
पिसून प्राण वाजते अनाम ताल बांसरी
अपार दाटलों असा पुसून आसवें तुझीं
आसवांत नाहली प्रीत प्रत्ययास ये…
आसवांत नाहली प्रीत प्रत्ययास ये…

मराठी ग्रंथ संग्रहालय
दा. क्र. ९८८७५
शाखा
(स्थळ प्रत)

सावंतवाडी, जून ६६

## कालच या वाटेवर

आज ज्या वाटेनें मी चाललों आहें
त्याच वाटेनें उद्यां मी जाणार आहें
इथल्या साऱ्या फुलांचा नि लसलसणाऱ्या
हिरव्या तृणपात्यांचा निरोप घेऊन
पहाट फुटून भल्या पहाटे कितीदां वाहिला
गार पहाटवारा घरांच्या डोईवरून
कुरवाळीत गांव आपुलकीनें
निळाईतून झुरुमुरु झुरुमुरु झरला चंद्र अंगणांत
पणत्यांच्या पूर्ण प्रकाशांत न्हाऊन निघाली तुळस
कालच या वाटेवर
ती भेटली होती
आणि क्षणांत एका ओलावले
काळजांत पेटणारे हजारों उन्हाळे !

फोंडाघाट, १७-११-६१

## दीपच झाकूं लागतात प्रकाश

दीपच झाकूं लागतात प्रकाश
मग मी कुणाकडे पाहूं सांग ना मला ?
तुझ्या काळ्या गॉगलखालचा
मीं पाहिला होता प्रकाश–त्या सहलींत
दीपांनींच नव्हत्या का शपथा घेतल्या
मानेंत मान घालून ;
अंधार करून एकान्त देणारीं समजूतदार झाडें
आसावरींत बुडालेली तारांची रांगोळी
अनवाणी चालतांनाच सौभाग्यवती झालीं होतीं ग
आपलीं पावलं...
सुकुमार सूर्याला जळभरती आवडली होती तेव्हां
तुटून परत भिजण्यासाठीं
प्रकाशांत चालणारा मी : तूंच शिकवलंस मला
मी तरी काय करूं सांग ?
...चांदणेंच अंगावर सांडलें थोडें तर...

मुंबई, १२-२-६०

## आणि धुमसत्या प्रश्नांना

आभाळाचा रंग निळा कां ठरला खोटा
काळोखांतच बडून गेल्या माझ्या वाटा
तुला तमानें गिळली कीं तूं खोटी असशी
मी माझ्यास्तव जळतों आहें असा एकटा

तारे मोजुन माप तुझ्या मीं दिधलें हातीं
मला म्हणालिस 'असे कसे हे खोटे मोती'
मी जळतांना धर्गींत नव्हतें तुझें चांदणें
अश्रुतुलेवर तोलुन दिधली तुला प्रतीति

मी स्वप्नांतुन अखंड फिरलों स्वप्नांसाटी
स्वप्नांनंतर रात्र अघोरी होउन फिरते
स्वप्न सत्य का रात्र खरी तें मला न टाउक
हात फुलांच्या भंवतीं असतां रुतले काटे

दीपदयेवर फक्त झुलावें पतंग जाणे
(कां मृत्यूच्या लयींत मंगल सनई घुमते!)
आभाळाचा रंग तुझ्या मग ठरतो खोटा
आणि धुमसत्या प्रश्नांना नच उत्तर मिळतें...

मुंबई, सप्टेंबर १९६२

2996 [illegible]

## करार

थेंब थेंब
इंद्रधनु
ओठांवर
ओठ जणूं
रंग ओले
गार गार
तिचा माझा :
असा करार...

मुंबई, १९-७-६१

## फुलें फुलें

फुलें फुलें
जीव भुले
तिचा माझा
चंद्र झुले
माझ्यासाठीं
मधवाटी
उष्टे ओठ
तिच्यासाठीं...

मुंबई, १९-७-६१

## चंद्रबिंब

झुंबरल्या अंबराला
        मंद्र लोलक ताऱ्यांचे ;
सांद्र समयीं मनांत
        तिचें चंद्रबिंब नाचे...

मुंबई, ३०-११-६०

## काळोखांत बोलतांना

काळोखांत बोलतांना
        हात तिच्या खांद्यांवर
भरसांजे गोळा होतें
        पहाटेचें दहींवर...

मुंबई, ३०-११-६०

## श्रीरंग

दूर नभाच्या पल्याड आहे उभा कुणी श्रीरंग
उधळित पिंजर तरल धुक्याची...झाडांवरती रंग
सूर्यबिंब झाकलें ढगांनीं झरझरतो पाऊस
किरणांच्या छायेंत अनामिक कलावतूंचे भास
उगवाईचा कळस दडाला ढग आले रांगांनीं
सह्याद्रीला कुणी फाशिलें भस्म नवें शैवांनीं
हिरव्या शेतांवरी सावळा रंग रुळे आकाशी
तृतीच्या पंखांत पोपटी तृणपात्यांच्या राशी
सारणिच्या पाण्यांत रंगलीं जळस्वप्नांचीं गाणीं
ही सृष्टीची हिरवी गौळण भरली कटि-खांद्यांनी
दूर नभाच्या पल्याड आहे उभा कुणी श्रीरंग
उधळित पिंजर तरल धुक्याची...झाडांवरती रंग...

फोंडाघाट, सप्टेंबर ६२

## भिजत राहते रात्र

भिजत राहते रात्र :
फिकट धुकें
वळवाचा पाऊस
मी निश्चल
चाळवते स्मृति तुझी
सहवास...
गोंदुन आलों
आयुष्य तुझ्या तळहातीं देउन
माथा :
तूं दूर तरी
सन्निध भासे
...केसांची सळसळ...

सावंतवाडी, नोव्हेंबर ६४

## चित्र

दिशांचा रंग राखी राखी
वाकुन झाडें
उभीं अनोखीं
अंबर थरके
डोंगर डोंगर धुकें
डंवरुन भंवतीं
मेघांची घनदाटी
मीहि अनिश्चल उभा
कांठ तळ्याचा
ओढुनि घेई
चित्र उराशीं असें
जळावरि, रंग गारगारसे...

सावंतवाडी, ऑक्टोबर ६४

## निळें शिल्प

निळें शिल्प भासांतुनी शाश्वताच्या
उभें तूं मनीं या किती योजनें
दिशादूर दर्यांतुनी वाहतों मी
तुझीं ऐकतां ऐकतां स्पंदनें

शिळा रुद्र झाल्या तुझ्या दर्शनानें
असें कालकक्षेंतुनी ऐकतों
इथें शब्द माझे मुके पामराचे
तुझ्या प्रार्थनेला खडे ठेवितों

निळें शिल्प भासांतुनी शाश्वताच्या
मला जाणवे रूप ध्यासांतुनी
अमर्याद आलेख तूं वेदनांचा
परी कोवळा चंद्र डोईवरी

प्रभातीं रवी भाळ चुंबी तुझें अन्
क्षितीजांत ओली तुझी प्रार्थना
तुला अर्घ्य द्याया उभा मी; उभा मी
सदाचीच प्राणांत आराधना

अनंतांत तूं; अंत होतो धुक्याचा
तुझे पाय रोवून पृथ्वीवरी
तुझी शीळ येते दुरांतून ऐकूं
घुमे देह छंदांत गीतापरी

मुंबई, २-१२-६१

## गर्द धुक्याच्या राती

समोर डोंगर भवतीं झाडें गर्द धुक्याच्या राती
माड मला कळसासम दिसती झाडें धुकीं धुकीं
फिक्या दिव्यांनीं उजळे रस्ता जळे तमाची काया
मनीं माझिया अशा अवेळीं तुझ्या रुपाच्या छाया
या छायांचा डाव रंगतां चित्त भ्रमे एकाकी
एकाकी हें जीवन माझें दूर तुझ्याविण साकी
रात्रीवरती अमल धुक्याचा वर घुमरें आकाश
वेल विजेची निळी प्रकाशे क्षितिजाच्या टोकास
निश्चल डोळे सिगार जळती मी बघतों भंवतालीं
समोर डोंगर उरती झाडें रात्र मला छळणारी

सावंतवाडी, ४-१२-६३

## चांदण्यांत सुरूचें झाड अंगावर कोसळावें

चांदण्यांत सुरूचें झाड अंगावर कोसळावें
माझ्या देहाच्या सावलीवरून तूं निघून जावें
कुठें भेटलों होतों आपण तें आतां आठवत नाहीं
तुला मीं पाहिलें...पाहिलें...आणि भेटलों मात्र नाहीं !
वाटलें होतें भिडावें आणि दर्याचा हुंकार द्यावा
पण उराआड चंद्र तुझ्या—तूंच माझा लपवावा
नेहमींच अशी तूं; माझी अस्मिता हेलावे तुझ्यासाठीं
गेल्या जन्मींचें ऋण मला तुझ्या पावलांच्या खुणांसाठीं
घरंगळे आरक्त सूर्यबिंब पहांटे प्राचींतून–तशी तूं
दिगंतीं वाहणारें धुकें माझ्या प्राणांना चंदन लेपून
कळूं लागे जीवनाची नश्वरता; तरीही नेत्रांना पूर
घमघमती गंधवेल दरवळून गेली आज माझ्या खोल उरामधून
देऊं का ललकारी दिशांना : तूं आज आली आहेस
सांगूं का भ्रमंतीचा अर्थ : आकाश संपलें आहे
पलीकडे न पुरणारे पर्वत; अलीकडे आकार धरून बसतात
माझ्या डोळ्यांतच आज तूं : मला डोळे बोलावतात...

सावंतवाडी, १६-१२-६३

## धुकें

धुक्याधुक्यावर रुजलीं झाडें पहांट झाली वेडी
खिडकीमधुनी धुकें धावलें रांगत मजला वेढी
कुरळ्या माझ्या केसांमधुनी तरल धुक्याचीं बोटें
भास तुझे मज होती होती...कानीं श्वास अनोखे
भ्रमून आलों या भासांस्तव; जगलों यांच्यासाठीं
वाट तुझी दंव शिंपित जाते धूसर क्षितिजापाशी

सावंतवाडी, ४-१२-६३

# शब्दांत पकडतां येत नाहीं

शब्दांत पकडतां येत नाहीं इतका पाऊस आणि तुझ्या आठवणी
असह्य होते रात्र; कशी करूं कशी करूं आत्म्याची समजावणी
तुझ्या गरमगोऱ्या हातांचा विळखा पेलविलें आकाशाला अकस्मात
माझे खांदे मोडून गेले; मोडून गेले; कसें सांगूं कसें सांगूं मायाविणी
दूर राहिलें मंदीर; एक आरक्त डोळियांची कहाणी; आज जिवालागीं ओढणी
कळली नसती येतां येतां तर फुटला नसता ऊर असा भंगून भंगून
खुळे झाले हात...खुळे झाले डोळे आणि आगंतुक आरतीची वेळ झाली
तुझ्या डोळ्यांमधली अधीरता माझ्या गालांवर डंखमंद्र गौर झाली

शब्दांत पकडतां येत नाही इतका पाऊस; दिशा राखीरंग झाल्या
वर्षेचा अनासक्त आविष्कार माझ्या मनाला पूर आला
समोर आहे एक डोंगर त्यावर धुकें धुकें येतें आणि मी हरखून जातों
तुझ्या डोळ्यांचा खोलपणा मला इथें अनावर होतो परी कसा मुका होतो
उत्तुंग पर्वतांना कसा घालूं सुगंधी उखाणा माझ्या कळीरंग दुःखाचा
माडांचा जीव जाईल तोलतांना धुकीधुंद रात्र; पावसाची ऋचा ऋचा
खळाळून वाहात येतें पाणी पाणी; कौलांवर पागोळ्यांचीं सुरू गाणीं
आज वारा विसरला आहे घर; घराचीच निशाणी; माझ्यावाणी...

एक पहाट पकडली आणि पाचूच्या पायघड्यांवरून लहरत गेलों आसमंत
वर्षेच्या अभिसारांत हिरव्यागर्द सृष्टीचा संगमोत्सुक नखरा; तुझ्या आठवणी आल्या
निळाधूसर सह्याद्री आभाळाला भिडलेला, स्वच्छ पाण्यावर रेलून दुधी दुधी धुकें–
तुझे गाल आठवले; अंगावर उडविलेलें अत्तर; अंतीं ओघळलेले अश्रू...
कुठें शिकलीस पूजेची पद्धती ? म्हणालीस "कुठें वाट चुकला देव..."
खरंच; वाट चुकून तुझ्याकडे आलों असतों, तर देवाचा माणूस झाला असता!
तुझ्यापासून दूर आलों या माडांच्या देशांत; जिथें झाडें रात्रीचें धुकें पांघरतात
असह्य होतात अशा रात्री; हें एकलेपण; चांदण्यांतही पावसाळी सरी कोसळतात

ज्या क्षणांची संगती लागत नाही आयुष्यांत त्या क्षणांनीं मला इथें आणलें
ज्या क्षणांची वाट पाहात आपण कधींही थांबलों नाही; त्यांनीं आपल्याला भेटविलें
भ्रमंतीचा शाप घेऊन जन्माला येणें हाही जीवनांतला एक योगायोग
नाहींतर, तूं तरी कुठं भेटली असतीस? हासुद्धा एक प्रश्न आहे : उत्तराचा :
खरंच; कित्येकदां कांहीं खरं नाही...कांऽहीं खोटं नाही...फक्त आपण असतों हेंच
एक सत्य असतं

देण्यासारखें खूप होतें माझ्यापाशी; तूं मागूनही मीं दिलें नाही—दिलें नाहीं—खंत आहे
"माझ्यावरती गाणें लिहा..." हट्ट तुझा अस्मिते, म्हणून—म्हणून—ही शब्दांची पर्वणी
शब्दांत पकडतां येत नाही इतका पाऊस आणि तुझ्या आठवणी

सावंतवाडी, ऑगस्ट १९६३

## लवत लवत घन

लवत लवत घन...
माझ्या जवळुन
गेला आज सकाळीं
पिळून आल्या
मनिंच्या धारा
धुमसत नव भूपाळी
तटतटली यमुना—दोघांतच—
जळ भरलें—तुटले पिळ आंतिल
दो नयनांतिल
दिशाकिनारे
बुजुनि धुक्यांतच गेले
डोळयांमधलें काजळ माझ्या
ओठांवरती आलें...
लवत लवत घन
जळ ओथंबुन...

सावंतवाडी, ऑगस्ट ६४

## झाडें पेटुन धुकें राहिलें

झाडें पेटुन धुकें राहिलें कवळित छत गगनाचा
माझ्यांतुन पेटला चांदवा मुकी जाहली वाचा
नुरल्या सगळ्या दिशा, काल, क्षण ; मीपण गेलें वाया
धुक्यावरी सावल्या जाहल्या शिल्प तरंगत छाया

सावंतवाडी, २४-८-६७

## रंगारी

विश्व रंगविणाऱ्या रंगाऱ्याला
मी डोळे विकले
        त्या संध्याकाळींच
मी पहात होतों
कांपरा प्रकाश रंगवितो कशीं झाडें ?
त्याच्या अदृश्य कुंचल्यांतून
उसळतात
अप्रतिहत
रंगांचीं फुलपांखरें

मुंबई, २१-९-६०

## सायंकाळ

सायंकाळ
झुळूझुळू
        तिला वाटे
        दूर पळूं
फुले तारा
येई वारा
        चहुंबाजू
        भूरभूर
चंद्रऊन
चंद्रऊन

मुंबई, १९-७-६१

## चंद्रवेळ झावळांत

चंद्रवेळ झावळांत आणि उराला भरती
सुईपानांत सुरूंच्या पेटतात चंद्रज्योती
लगबग पावलांत मनें दूर वाहतात
डोळ्यांपुढें धांवणारी तुझी उधळती वाट
तुझी उधळती वाट गंध उधळींत धांवे
तबकांत आरतीला एक निरांजन तेवे
एक निरांजन तेवे कधीं अशा चंद्रवेळीं
ऊर ऊर स्वरावळ ओठ अमृताची कळी

मुंबई, २७-४-५९

## मृग

तुझीं स्वप्नें जागवितां
निळें आकाश हाललें
माझ्या हातांना तेधवां
ओले अश्रूच लागले

कसें तुंब तुंब झालें
विजा लागल्या गा घुमूं
शैव सह्याद्रीच्या माथां
ढग लागलेत जमू

आतां पडेल पाऊस
अहा ! वैशाख शांतला
आज माझ्या घरावर
मृग नव्यानें धावला

फोंडाघाट, २५-५-६२

# मुक्या जंगलांतून जातांना

१.

मुक्या जंगलांतून जातांना गाण्याचा एक दुखरा सूर दरवळतो
शिवालयांतील घंटेच्या नादांत; टळटळीत दुपार; भूपाची धून
धुपानें उजळलेला गाभारा, शिल्पांतील बुलंद नंदी, फणींद्रमाथा शिवचंद्रमौळी
बाहेर कार्तीवसें उद्यान
तुझ्या डोळ्यांतील आरती देवाची होती कीं माणसाची ? कीं माझी ?
लुटून गेला एक थरमरता क्षण प्रीतीची अथांगता
माझ्या प्रवासी जन्मांतील ;
कटीवर बाळ होतें हांसत त्याची शपथ
तुला विचारायचें राहून गेलें...

२.

कुणाची शपथ घेऊन सांगूं मी
जन्मापासून तूं पान्हा चोरत आली आहेस म्हणून ?
कदाचित् त्यामुळेंच गाण्याला दुधाचे सूर फुटत असतील
हवेलाही स्वरांचे रंगीत पंख फुटतात काळोखांत
मी कितीवेळां तुझे अदृश्य स्वर ऐकले आहेत
माझ्याशींच शिल्पमुग्ध होऊन एकांतांत
घनांध आघ्राढांत कांहींच दिसत नाही
तरी सारेंच क्षण सगुण सावळे होऊन जाणवतात
आणि तुझ्यांत मी हरवून जातों...

३.

परवां तूं नव्हतीस म्हणून खळनाथाच्या दर्शनाला गेलों
वाटलें, तो नाही भेटणार अभाग्याला भर दुपारीं
म्हणून गाभाऱ्यालाच प्रदक्षिणा घातली आणि हात जोडले
बंद दाराचीं कवाडें अचानक उघडलीं
दिशांच्या पाकळ्या अशाच उघडतात
आपण आकाश झाल्यावर...

४.

या कोलाहलांत भर बाजारांत तुला मी एकदां भेटलों आहें
एकच अतर्क्य क्षण–त्या क्षणानें मला हलवून सोडलें
मुक्ताईच्या अंगावर पडलेली वीज अशीच होती काय ?
उत्तररात्रीं गौतमाला यशोधरेच्या डोळ्यांत जी झोपलेली आढळली ?
निद्रिस्त राहुल चाळवला नसेल कदाचित् तिच्या वेल्हाळ कुशींतून
तुझ्याशीं जखडून टाकणारी ही मंत्रशक्ती
खोल, खोल कुठें वाटचाल करते आहे महाराणी,–

५.

विद्ध वाटा, विद्ध शर, क्रुद्ध आपणच आपल्याशीं
डोळ्यांची वाळवंटें होतात जर बिघडलों स्वतःच स्वतःशीं
नाहींतर…
हिरवासमुद्र तशी शेतें बहरून येतात मनावर
निनांवी तृणांचीं पातीं, फुलें, फुलपाखरें मुद्रा कोरून जातात
आपली
मनाच्या निळ्या महालांत
या महालांत प्रत्येकाला एक आगळेंच रूप असतें ; आकार असतो
या सर्वांचीच असोशी आहे मला जन्मापासून
मला रंगवायचीं आहेत शब्दांच्या कुंचल्यांनीं मातीला फुटणारीं फुलपाखरें…

६.

मुक्या जंगलांतून जातांना मुक्या पावलांना वेग येतो
गाणें घळत जातें झाडांच्या पानांवर
प्रत्येक पानाचें मन, तृणाचें दान, दगडांची स्थितप्रज्ञता
दिव्यांचे खांब, मोटार, माणसें, जग, भूत, भविष्य, वर्तमान
ब्रह्मांड
सारेंच सारेंच कसें अद्‌भुत्
तांबुस पाउलवाटा हिरव्या कुरणांत शिरतांना
पाऊस रिम्‌झिम् रिम्‌झिम्
आभाळ भुईवर येतें लवत लवत
डोळे घन घन गोविंद…

सावंतवाडी, २१-१०-६७

## कविता

मी कविता वाचतांना
कविताच समोरून जाते
पावसाच्या धारांतून
पुन्हा बहरून येते

निळ्या डोंगररेषांनी
गांव हिरवा हिरवा
माझ्या वाणीला झोंबतो
तिच्या वेणींतला मरवा

छुपे मांजरीचे पाय
तिची घाई घाई होते
माझ्या शब्दांत मेघांची
दाट काळी शाई येते

सावंतवाडी, सप्टेंबर ६४

## दयामूर्त आकाश

तुझी पापणी एकदां व्योम झाली
दयामूर्त आकाश मीं पाहिलें
मला ध्यास आभास त्या पापणीचा
नको त्यांतली तारका वा फुलें

किती पाहिले उंच गेले मनोरे
नि आले भुईला तुवां फुंकितां
नको पाहण्याला असा नाश माझा
मला एक दे ती तुझी अस्मिता

तुझीं अक्षरें मी लिहावीं जळानें
तिथें रंग येवोत रक्तांतले
निशागूढ माझ्या व्यथा चुंबिती
भास माझ्यांतुनी ; फक्त स्वप्नांतले

कळे दुःख माझें मुकें विश्वव्यापी
पळे दूर माझी लुळी क्षुद्रता
दिवे झाकितांनाच स्वप्नांत येशी...
थिटे हात माझे तुला मापितां

दयामूर्त आकाश तूं पौर्णिमा ; मी
निळा भास आभास जातों धरूं
कळे नाश होतो विनाशून पत्रें
परी पूजनीं कां भिकारी ठरूं ?

मुंबई, २९-७-६१

## वळणावरती वळण

वळणावरती वळण
जीव जाहला कोकरूं
माझी अहंता पाहते
सारा दिगंत पोखरूं

कैशा आडमुठ्या लाटा
वाहतात छंदाविण
आणि पोकळ श्वासांचें
छातीवरती वजन !

कसा अभिमान धरूं
यांच्या ढळत्या टिळ्याचा
माझ्यासाठीं तेवविला
नंदादीप कुंकवाचा

बुक्क्यांतला काळा रंग
चंदनाला चढे चढे
टाळांतून मृदंगाला
एकदांच साद पडे

वळणावरती वळण
जीव जाहला कोकरूं
माझी अहंता पाहते
सारा दिगंत पोखरूं

मुंबई, ३०-१२-६१

## साथी

झाडांच्या निःशब्द मंडपाखालीं आभाळ ओथंबून येतें पावलांशीं
अशावेळीं माझ्याशीं कुणीतरी कुजबुजत असतो जन्मोजन्मींचा साथी
दूर क्षितिजावर अस्पष्ट रेंगाळणारी त्याची वाट दिसते उजळतांना डोंगर
मला हाकारून निरोप घेईपर्यंत तो कधींच म्हणत नाही 'मी जातों'
तो जातो आणि असतोही...
जेव्हां झाडें डोळ्यांवर येतात त्याच्या नुसत्या विस्कटलेल्या केसांसारखीं...

सावंतवाडी. १२-११-६८

## सर्कस

हत्तीचें आज्ञाधारक पिलूं, एक घोडेस्वार
पलीकडे जिराफ आकाशावर त्याची मान
उंटाच्या पाठीवर टोपी घातलेलें माकड
दोन पायांवर झिंगत येणारें अस्वल
वाघानें गच्च पकडलेला सिंह
सिंहाची आयाळ पेटविणारें एक विदूषक पोर
ढगाळलेला आभाळाचा फाटका तंबू—
ही सर्कस मनांतली
बँडसहित उतरली आहे :
...या सायंकाळीं
...झाडांच्या आकारांतसुद्धां

सावंतवाडी, १०-८-६९

## मिठी

घुमत घुमत मनाआडून झाडें रुजून फेर धरतात
दूरचे दिवे जवळ...जवळ...सभोवार कळे फुलतात
मल्हारल्या दिशा त्यांचा डोळां रंग...कानीं धून
आंत-बाहेर भिजून चिंब नसनस तरारून
तळेखोल तुझे डोळे श्वास श्वास येतात उतूं
माझ्या डोळां जडे सांज वाटतें इथेंच आतां मिटूं
जड जड होतों मी करूं नको मिठी सैल
तुझ्यांत मी मिटतांना नाही उरत ऐल-पैल

सावंतवाडी, २८-१०-६९

# अकल्पीत यात्रेंतला मी प्रवासी

तुझे हात हातांत देशी जरी तूं
मला दूर खेचीत आहे कुणी
तमीं सांद्र अश्रूंतली चांदणी ; मी
तिचे ओठ दंशून आहें ऋणी

चुके जन्म येथून सारा उणा ; मी
निनांवी निनांवी तिचा चंद्रमा
भरे दूर आकाश काळ्या ढगांनी
उगाळून नेत्रीं विजांच्या खुणा

शिळे जन्म घेऊन झाडें उभीं हीं
तरारून अंतीं उभींच्या उभीं
उभा वृक्ष माझा मि आकाशगामी
फुटे मूळ पृथ्वीस उल्लंघुनी

शिरीं चंद्र ताऱ्यांत काळोख सारा
जळे जन्म शब्दांत माझा पुन्हा
उरीं खोल कल्पान्त आणि भ्रमन्ती
न डोळां पुरे व्योम—त्याच्या कडा—

क्षमारूप मांडीवरी भैरवीचे
तुझे सूर छेडीत...निद्रिस्त मी
तरीही तरीही मला जाग येते
दिसे दूर अदृश्य होतें कुणी

अकल्पीत यात्रेंतला मी प्रवासी
तुझा नी जगाचा गमें सोयरा
उदासी मनाची अशी भारतांना
तुझे हात होती मला कासरा

सावंतवाडी, ९-९-६६

८०५९
२९९६
४१० ९३१५

## टिळा लाव माझ्या जुन्या अक्षरां

तुझा पुत्र आलों तुझ्या दर्शनाला
घनांतून हाकेस कां अंतरा
मिठीनें तुला मापण्याची अहंता
न हातास लागे कुठे कोपरा

बुडाल्या दिशा दूर अंधार झाला
फिरें चक्र मी, हंत माझ्यांतुनी
परी सापडेना तुझ्या मंदिराची
धुळीनें जळीं माखली पायरी

ध्रुवांच्या कडा लाल आरक्त झाल्या
उरीं पेट घेई निळा गारवा
तुझा सूर्य दे...सूर्य दे...फाटु दे ना
जडाकाशकाळोख हा येथला

दिशाफाळ हुंकार गात्रीं विजांचे
कशी रात्र सोसूं हवा वादळी
मनोशिल्प आकाश वाटे तुटे अन्
भरे अक्षरांच्या तळीं पोकळी

तुझा पुत्र आलों तुझ्या दर्शनाला
घनांतून हाकेस कां अंतरा
मिठीनें तुला मापण्याची अहंता
टिळा लाव माझ्या जुन्या अक्षरां—

मुंबई, ७-१०-६२

## तूं निवारा

तूं निवारा
मी सहारा
        देऊन जा
        फूलवारा
काटे नको
कळी हवी
        शब्दांतून
        वीज नवी
किती दूर
किती दूर
        दिसूं लागे
        पंढरपूर...

मुंबई, १९-७-६१

## मना नच भय

मना चंदनाची
सदा ओढ माझ्या
जेथ सुखदुःखा
जाग न ये
ओढ ही समाधी
तंद्री तिची लय
मना नच भय
तेथ माझ्या...

मुंबई, २५-१-५८

## खूण

शब्दब्रह्मामध्यें
अणू माझा एक
माझा म्हणोनियां
      असूं देत
अस्तित्व शब्दांचें
होतां ब्रह्ममय
खूण त्याची होय
      तेवढीच...

मुंबई, २५-१-५८

## पुष्कळाची वाट

आदी आणि अंत
जेथ नाही तेथ
कुणीतरी मज
उभा दिसे
निष्फळाची बात
पुष्कळाची वाट
यांच्या तिठ्यावर
घर त्याचें...

मुंबई, २५-१-५८

## वाट

रात्रीच्या डोळां
प्रकाशाची वात
लावूनियां, वाट
पाहतेस ;
चंद्र होई तेव्हां
वाटाड्या सौंगडी
वाट फुलें तोडी
पावलांनीं...

मुंबई, २५-१-५८

## दुःख

वाटलें या मना
जुळतील खुणा
गतजन्म उणा
होऊनियां ;
दुःख जळे मनीं
फक्त एकलेंच
झांकिलेस कान
बोलाआधीं...

मुंबई, २५-१-५८

## दासांच्या पादुका नेतांना

जत्रेंत ढोल वाजले उत्तररात्रीं मी अर्धझोपेंत असतांना
आजही मी ऐकला ढोलांचा गजर. . .झांजांचा दिशानाद
दासांच्या पादुका नेतांना
मी नमस्कार केला भर रस्त्यांत उभा वाकून
एका संन्यस्तानें माझ्या हातावर ठेवलीं फुलें
मला तसा पाहतांना
वाटलें फूलच होऊन जावें त्या यात्रेंतून
पादुकांच्या समाधीवर
(निर्माल्य आयुष्य फुलांचें कीं अश्रु हीच फलश्रुति
फुलांच्या देठांना ?)

सावंतवाडी, २१-११-६५

## माझे हंबरले प्राण

माझे हंबरले प्राण
तुला भेटतां भेटतां
काळे बोलले पाषाण
तुझा गाभारा हिंडतां

मन मुकें मुकें झालें
आणि वाकलें आभाळ
दिशांदिशांतून कुणी
मंद झंकारीले चाळ

झालें भिंगरूं जिवाचें
तुझ्या पायांत घुंगूर
उडूं लागलें वासरूं
कांस तुडुंबतां ऊर

हंबरले प्राण माझे
त्यांचे चंद्र चंद्र झाले
डोळे फुटून एकदां
घन अमृतांत न्हाले

तुला पाहतां, भेटतां
असें कांहींतरी झालें :
काळ्या पाषाणांत मला
निळें आभाळ दिसलें...
निळें आभाळ दिसलें...

मुंबई, १६-१-६१

# बैल

सह्याद्रीच्या दऱ्याखोऱ्यांतून
डुरकत फिरणारा एक कलंदर बैल
उभ्या शिंगांचा
कोल्या रंगाचा
मस्तीला आलेला
घळणीच्या लाल मातींत खळणीस येणारा
चौखूर उधळतो आहे माझ्या रक्ताच्या कणाकणांवर!
उभें आकाश पितात
त्याचे नशाबाज डोळे
लसलसतें उग्र मस्तकीं
वज्राचें बेगुमान पाणी
डोईवर चंद्रमा फल्कता
कराल दाढांना पुरत नाही
हिरवें लुसलुशीत गवत
त्याची मातीशीं मस्ती
मातीच होते मस्ती त्याच्या संगमांत
हुस्कारांत प्रणव... ॐ कार...
वशिंड घोळवीत बाहुबल अजमावणारी त्याची खानदानी चाल
आदब ;
रिमझिमत असते या मनांत
बैल : पिढ्यापिढ्यांचा पोशिंदा माझ्या
शक्तीचा सम्राट
माझ्या रक्तामधून, शब्दांमधून
उसळत राहते रोज
एक अनाम शक्तीची लाट

फोंडाघाट, १४-४-६५

# अंबादर्शन

मी अंबेच्या दारामध्यें मग्न निवांतीं
गाभाऱ्यांतुन फुलून आल्या अनंत वाती
एकीभंवती नटलें होतें वलय विजेचें
काळजांतल्या गहन तमावर त्याची दृष्टी

उलून माझ्या देहामधला प्रकाश काळा...
घुमत राहिलों मी ज्योतीस्तव अखंड तिष्ठत
भाळावरती टिळा धुळीचा मंत्र मुखांतुन—
मला अकल्पित शब्द दिशांतुन गेला पसरत

घणघण घंटा नाद निरामय फिरलें देउळ
पाषाणाच्या खांबांतुन ती आली हांसत
साक्ष ठेवुनी वक्षामधल्या निळ्या अनंता
कर उल्केचे देवीपुढती होती जोडत

बट केसांची भाळावरती...लवे सुरंगा
हास्य उमेचें निगूढ ओठीं...उभी अनंगा
जुळले डोळे...आणि थरारुन देह-राउळें
मी अंबेचा जोग मागुनी झालों भगवा

सावंतवाडी, ५-५-७०

## अजिंठा

कुठले तरी अज्ञात हात इथें कांही कोरून गेले
बघतां बघतां माझे डोळे तिथेंच आज राहून आले

संपून गेली काळझळा आणि वेळा भरून आली
दगडांवर स्वप्नशिल्पी फुलपांखरें पेरून गेले

कळलें नाही त्यांचें त्यांनाच अनाहूत आल्या लाटा
उरांत खोल भरला वारा त्यालाच ज्योत लावून गेले

गुंग उभे काळे खडक, प्रकाशलाट झाली वाट
घुमल्या दऱ्या पिचले घाट, मध्येंच चंद्र रुजून आले

माझी माती माझा कडा आभाळाचा वर घुमट
हुंकारून गेले प्राण ॐ काराची तान पुसट

मुंबई, २७-१-६२

## ही जागा

ही जागा :
ज्या ठायीं मीं आकाशाचीं स्वप्नें रचलीं
ही जागा :
ज्या ठिकाणीं माझीं ध्येयें खचलीं
ही जागा :
जिथें मनीं आत्मनाशी विचार आले
ही जागा :
जिथें माझे मित्र मला माझा म्हणाले
ही जागा :
माझ्या स्वप्नांच्या धूसर आकृतींची
ही जागा :
ऑफेलियाचें वेडगाणें गुणगुणायची
ही जागा :
जिथें सीतेचे डोळे दिसले
ही जागा :
जिथें माझे बेत फसले

सावंतवाडी, १५-११-६३

## केशवसुतांना

तुझी उदासी मजला ग्रासी मी भ्रमतों माझ्याशी
तुझ्यापरी मन करी झपूर्झा पागल रंग नभाशीं
जळावरी जळ करितें झुळझुळ तरंग सरके कांठा
वाटेवरती झाड लागतें जिथें थांबती वाटा
लोक सांगती इथें बसुन तूं लिहिली 'संध्याकाळ'
मृत आशांच्या चितेवरिल तव पिशाच रानोमाळ
भ्रमत फिरें मी शोधित भृंगा, स्तब्ध मुक्या झाडाशीं
कांठ तळ्याचा...झाड उभें कीं...तूं क्षितिजीं...आकाशीं... ?

सावंतवाडी, २४-९-६६

## कृष्णा गोसावी

डोळे गेलेला कृष्णा गोसावी
कानांत मुद्रिका, केसाचें झिप्पर : झांकून भाळ डोळे झांवळे
सपाट्यांतून रखडत रखडत
फोंड्याच्या बाजाराला येतो
मोरया डोंगरावर फिरून जातो
भर उन्हांत...
सागासारखा ताठ उभा चाललेला
भेटतो मला वडाच्या माळावर

डोळे नाहीत तरी
स्पर्शानें ओळखतो वा चालीनें जाणतो माणूस, ज्याच्यांतील
पार्थाचें सोंग दहिकाल्यांत घेऊन नाचणारा
कलावंत मेला आहे !

म्हणाला मला परवांच,
'पटेल, डोळे गेले
पण आपलीं माणसें दिसतात मला...'

फोंडाघाट, १३-२-६६

## तो

काळ्याकुट्ट दुःखाचें गाठोडें पाठीशीं मारणारा एक म्हातारा
अचानक भेटला गर्दीच्या कोलाहलांत (मुंबईत)
मी त्याला चुकवून चाललों होतों पुन्हा भेटूं म्हणून केव्हांतरी
पण त्यानेंच मला पकडलें पाठीवर थाप देऊन!
आशीर्वाद घरीं येतात असे चालून :
आणि आम्ही धावतों दुर्दैवाच्या महालांत झिंगण्यासाठीं
त्यानें सुखाचे चंद्रकण टिपण्यासाठीं
आयुष्याची माती केली आहे
त्याला कविता आवडते...;
आमच्या स्वप्नांचे दिवाणे पक्षी बसतात कधीं कधीं
त्याच्याहि खांद्यांवर
एखाद्या कातरवेळीं आमच्या दुःखाची परवचा
ऐकतांना मात्र :
त्याचे मुके डोळे घळघळूं लागतात...

मुंबई, १७-४-६३

# कधीं कधीं

कधीं कधीं विश्वासाला
अचानक जातो तडा
जसें गोरें दूध नासे
पडूनियां मीठखडा

खरेखोटें उधळतें
दावी रुबाब तेरडा
आणि वदंता उठते
जणूं गाभणच रेडा!

देव मानून पुजावा
तोचि निव्वळ फत्तर
जसें कापसी बोळ्याचें
जावें निघून अत्तर

माया होते पांगळी नि
गांगरतें मन वेडें
कूळ विश्वासाचें जें जें
तें तें होतसे लंगडें

थांग लावावा जयाचा
तेंच उभें हातापाशीं
होतें स्वतःपाशी तेंच
जाई निघून अधाशी

प्रेम द्यावें त्याला वाटे
देतो कांहीं उफराटें
एका मना केव्हां केव्हां
लक्ष लक्ष होती फाटे

कधीं कधीं असें होतें
जाई विश्वासाला तडा
आणि कुंपणापल्याड
धावे अचूक सरडा!

मुंबई, १९५७

## जुगार

सारें लाविलें पणाला
आणि वनवास आला
डोळ्यांपुढे चंद्र होता
तोही दिसेनासा झाला

पाय मातीचे तयाला
कसें देवपण यावें
धर्म आणि शकुनीही
होते जुगारी मेहुणे !

माझी रमी रंगली नि
आंधळ्यांना डोळे आले
त्यांचा नाच पाहतांना
माझे मात्र डोळे गेले !

मुंबई, फेब्रुवारी ६२

## परमेश्वरानें मला दिलेलें मन

परमेश्वरानें मला दिलेलें मन माझें नसतें तेव्हां माझ्या हातून चुका होतात
स्वप्नांचे रंग पाहणारे डोळे वास्तव जगाचें अस्तित्वच नाकारत चालतात
तळ्याकाठीं फिरतांना धुकें विरघळतें झाडांतून माडांच्या शेंड्यावर बसतें मन
जळावर जंगलचित्र काढणारे जिम्मेदार हात कुणाचे ? कुणाची आकाशकमाई ?

इवलीं इवलीं फुलपाखरें त्यांचे पंख यावे मना, म्हणून मी अस्वस्थ होतों
पडक्या भिंतींतून इतिहास कुजबुजतो कुठेतरी घंटा वाजत बंद पडते
मी धावतों फुलांनी खेळायला आणि फुलांचेंच दुःख मला जातें भेदून
कसें विचित्र आहे मन तें खरेंच समजणार नाहीं तुला सांगूनसवरून

परमेश्वरानें मला दिलेलें मन माझें नसतें तेव्हां माझ्या हातून चुका होतात

सावंतवाडी, २०-२-६४

## चुकल्या क्षणांची किंमत

चुकल्या क्षणांची किंमत मरणानें द्यावी लागते असे अनंत क्षण जगावे
तेव्हां आयुष्याचा थोडा अर्थ हातीं यावा
गीता लिहिणारे व्यास थोर कीं गीता सांगणारे भगवंत थोर
हासुद्धां एक थोरच प्रश्न!
मी मरणाच्या दारांतून जातांना मला कित्येकदां नाही कळला
गीतेचा अर्थ : जसें आभाळ आहे म्हणावें तर आहे, नाहींतर नाहीही...
मला नेहमीं प्रश्न पडतात स्वप्नसदृश मनोऽवस्थेंत :
आकाश छतासारखें कोसळलें म्हणजे ?
दिशालोप पाऊस थांबवितां येईल कां ?
चांदण्याच्याच गारा झाल्या तर—
इच्छामरणी भीष्मासारखा जन्मच आपल्या हातीं आला म्हणजे ?
एक कां दोन : अनेक प्रश्न : वाऱ्यापरी पळणारें मन देतें झलक
आपण नसतों तर चुकलें असतें कां कोण ?—
हाही एक हातचा प्रश्न शिल्लक राहतोच नाहींतर !

सावंतवाडी, मार्च ६६

## जन्मवाद्

माझें मला कधींच मिळालें नाहीं; हात राखून दिलेंस; कफल्लक तूं
माझे हातच घेऊन जा हवेतर; इतका कद्रू नाही मी : उमज तूं
अश्वत्थाम्याची भळभळती जखम आमुच्या भाळीं; कर्णाचा कर्मगहन शाप
आम्ही जन्माला आलों वैतागयुगांत हाही एक उःशाप आणि शाप!

कुणाला कांहीं सांगावें तर निराळा अर्थ: साराच अनर्थ होतो आहे
सतीचें वाण असें आयुष्य निखारे पावलांना भाजून टाकतात

उलट्या काळजाचीं माणसें भेटतात कधीं—ज्यांच्या भिंवयाही उलट्या असतात
वेळ साधून सापासारखीं परततात एरव्हीं वरवर हंसत असतात
अशांना साखरेंत घोळा तुपांत तळा तीं तशींच राहतील मेलीं तरी
मी पाहिलीं आहेत माणसें विशुद्ध : ज्यांना देवानेंही यावें शरण!

किती उन्हाळ्यांनंतर चांदणें पाहिलें ज्यानें जन्मवाद आरंभिला
मी पाहतों आहें निरंतर; उभ्या दाव्यानिशीं मला अंधार भेटला

काळोख झोंबतांना डोळां: मी पाहिलें चांदणीचें नग्नचंद्र सौंदर्य डोळे भरून
सुकुमार गात्रांनीं मला अंजन घातलें भडकलों असतां एकान्तीं समजावून
अजून रुमझुमती झुंजुमुंजु डोळे ज्यांना मीं तरऽ होऊन अवमानिलें
मी पूजित राहिलों; मी भ्रमांत राहिलों; मीं माझ्यासाठीं मलाच नाचविलें जगांत...!

माझें मला कधींच मिळालें नाहीं...

सावंतवाडी, १६-४-६५

## जिथें मीं जीव लावला

जिथें मीं जीव लावला तिथें जीव जायची वेळ आली
असें किती वेळां झालें तरी तळमळ कमी नाही झाली
निराश असतात झाडें वाटेवर त्यांनाही दुःख होतें
मी बोललों तरी गप्प बसतात वाट त्यांच्यांतच लुप्त होते
आयुष्यांत हंसण्यासारखे क्षण फार कमी आले
बहुधा मनापासून हांसलों तेव्हांही तें रडणेंच झालें
वाटतें, महंतांनीं हें बरोबर ओळखलें म्हणून ते हंसलेच नाहींत
सर्वस्व हरपलें तेव्हां आम्ही रडलों ते रडलेच नाहींत

सावंतवाडी, १२-२-६७

# दैवें भेट घडावी

दैवें भेट घडावी आणि तुटावी हा शाप कीं वर जाणे ईश्वर
कित्येक निसटत्या चेहऱ्यांना दिलीं नाहींत नांवें तरीही ते आहेत अमर
गंगेच्या कांठावर प्रसाद वाटणारी एक दीपकळी; आगंतुक
रुजूं लागे मनाच्या राउळीं; नसतां मी कुणीहि तिचा : ती निराळी

दुधासारख्या शुभ्र जळाच्या धारा वरी आकाश किनारा मध्यें फवारे फवारे
फेसावर तुषारांनी फुलविलें होतें इंद्रधनु: हवेची रंगधार; गर्भशीळ वारे
उन्हाची मखमली सावली; पिवळ्या फुलांचे घोस झाडांवर गरगरीत
त्यांतलें एक सूर्यफूल गच्च बसलें आहे रुतून...नाही निघत मनांतून

देवळासमोरचा एक बसस्टॉप: रंगीबेरंगी; दहाची नित्यनैमिक वर्दळ
वखवखलेला एक भिकारी, पाय नाहीत तरी जाई चालत : पैच्या कळीने
अख्खी रांग त्याची; आशानिराशा गोविल्या काखोटी : देहावर फक्त एक लंगोटी
पळें पळें जड होतात बससाठीं; आठवतो साहेब; त्याची प्रश्नमुद्रा: वेळेची वेलांटी

हुंकारावी घनचक्र गर्दीची गाडी; भरावी गाडीची शीळ कानांत कणकणून
कुणी द्यावी जागा; जुळावी मैत्रीची शाळा; हंसावें बाळ ओळखीची ओळख ठेवून
न सुटणाऱ्या प्रश्नांचीं उत्तरें द्यावीं निदान प्रयत्न करावा; मध्यें आपलें स्टेशन आलें कीं जा
कुणी सांगावें कां आलों येथें? कां हांसलों? कां गहिवरलों? कुठें असतें कुणाचें कोण

दैवें भेट घडावी आणि तुटावी हा शाप कीं वर; जाणे ईश्वर
पावलांवर पावलें ठेवून चाललों तरी ओळख नसावी हेंच ना उत्तर!
कुठें आहे नातें...कुणाचें? कुणाशीं? काल धरले हात तरी अळणी वळ
डोळ्यांनीच बोलावीं नातीं; जन्म जन्म ऋणांचें बळ आणि सोसावी कळ

पिवळा नारिंगी प्रकाश कातीत यावा देहशिल्प आकार तुझा : छांदसी
समोर गुदमरून हवा; कोंडावी दोघांपुरती चंचलता; इतुका वाव हवा
आर्त मुकेपण दोघांचें न बोलून शपथा आणि वचनांचे पाठ
अंतरांत अंतर राहून भिडावें : इतुकी ओळख : भेट : छे; हातच हातांत हवा!

मुंबई, २३-१-६३

## मीं सुखाला पाहिलें कीं

मीं सुखाला पाहिलें कीं अश्रु येती लोचनीं
दुःख माझें साजणे होतें तमाची चांदणी
वाटतें ऐसेंच राहो हें नभींचें चांदणें
पूर येवो लोचनांना पाहतां सौदामिनी

मीं सुखाला पाहिलें कीं दुःख होतें आंधळें
शोधितें कोठें सुखाची वाजुं लागे पावरी
नादतो गुंगींत वारा सूर लागे थर्थरूं
शब्द घेती योजनाचे वेध सारे व्यापुनी

मीं सुखाला पाहिलें कीं मी नभाचा सारथी
लोपती दाही दिशा अन् कांठ त्यांचे वाहती
मी न माझा राहतों धारांतुनी त्या वाहतों
प्राणवातींतून माझ्या, त्या सुखाला आरती
प्राणवातींतून माझ्या, त्या सुखाला आरती

मुंबई १९-८-६१

## जाच

एक चूक केली ती लांबत गेली; आयुष्य वाटतें तितकें नाही सरळ सुतासारखें
संगती असंगती प्रश्न एक आणि उत्तरें अनेक; कांहीं क्षण भेडसावती भुतासारखे
दंव चोरून प्यालों होतों स्वप्नांच्या काठांवरील; तळहात चुरचुरतात आतां
पाणी जाळलें तेलासमान त्याची नशा उतरली नाही अजून कधीं गातां गातां

कडव्या जिद्दीचा वारसा फोडला असता डोंगर तर डोंगरच नाही जवळपास
कुठल्या श्वासांचा धरावा विश्वास आणि म्हणावे माझे—फक्त झिंगलेले भास
कमान आकाशाची वाकलेली ताऱ्यांच्या फुलांनी जरा हलवावी वाटे मधून मधून
कितीही काळोख असला तरी उजळते प्राणांत देवघरांतील नंदादीपाची धून

उडून गेलीं आहेत पांखरें आषाढांतील घनघोर वादळानंतर—शिशिर अवेळींच आला
पानांचा पाचोळाही वाऱ्यासंगें पळाला निष्पर्ण खोड जसें उभा थंडीच्या आगींत
अंगावर भेगांतुन भळभळतें रक्त जपत जपत साहिली मी जीवनाची आभा
नुक्ता कुठे वसंत सुरू झाला आहे आतां : खोडालाच कोंब फुटून थरथरतो गाभा

उत्तरेच्या निःसत्त्व गर्भासारखे शब्द त्यांनीं फसविलें केव्हांतरी लाडे लाडे
डोईजड होतात अशीं नातीं; पस्तावतो फिरंगी वृत्ति जडून; त्यांचा जाच मात्र वाढे !

मुंबई, फेब्रुवारी ६२

## भुतें

माझें भूत चालतें मला खाऊन रस्त्यांतून वा पाऊलवाटेनें
रात्र असो दिवस असो सकाळ वा दुपार कळत नाही
तडव्या वाऱ्यानें कान बहिरे थंडीनें ओठ गारठून फुटतात

माणूस फुटतो आहे चहुंबाजूंनीं इतकें दिसतें; बाकी कांही नाहीं

बाकी कांही नाहीं भुताचे पाय तरी उलटे असतात; माझे तसे नाहींत
याचें दुःख आहे; हातीं गाणारें यंत्र रांध्याचें ऐकवतें मेल्या प्रीतीचीं गाणीं
खरवडून काढला वरचा सूर तरी काळजांत रुतणारी धून नाही

टेकडी असो पर्वत असो त्यावरच्या आभाळाला रंग नाही
मळभ असतें बरबटलेलें खालींवर ढगांनी; चिखल—नुसता चिखल
मनीं वासनेचा कर्दम त्याला वसवस नाही; ओढ नाही; तेढ? तीही नाही

माझें भूत चालतें मला खाऊन माझ्याशीं खदखदां हंसतें
टाळ्या पिटीत म्हणतें 'देवचाराशीं व्यभिचार कर—खवीस तर त्याहून बरा'
काल दीड वाजतां रात्रीं पाहिली भपकन् पेटती देवचाराची मशाल म्हाप्रुसाजवळ

जाणारा जातो. आम्ही म्हणतों त्याचें भूत झालें. बस्स. इतकेंच!

किती भुतें वणवण फिरतात डोळ्यांसमोर दुनियेच्या बाजारीं
कुणाची मादी चुकते; कुणाची बँक बुडते; कुणाला घर नसतें; वंश वाढत नाहीं
खायच्या अन्नाला मोताद झाला तरी बाई हवी म्हणतो गुलाम

बाई विनाशी! बाईच्याच गोष्टी खूप खपतात म्हणती हल्लीं संपादक
बाकी संपादकांचीं मतें हीं भुतें असतात शितावर चालणारीं!
आतां हिरव्या नोटांना तरी काय किंमत उरली आहे—अवमूल्यनानंतर?

जन्माला यायचें आणि फक्त तुंबलेलीं बिलें भागवायचीं इतका आयुष्याचा अर्थ!

माझें भूत चालतें मला खाऊन रस्त्यांतून वा पाऊलवाटेनें
जरा वाट चुकली कीं भेटतो एखादा झाळींत कंट्री झोकून
काल म्हणे त्याला त्याच्या रखेलीनें झोडला कारण साला आतां कंडम झाला

माझें भूत चालतें...

फोंडाघाट, ७-११-६६

## तो एक आणि तो एक

१.

तो एक आणि तो एक
दूर दूर गांवापासून...जगापासून...
उपरलच्या रस्त्याला : एका विमनस्क संध्याकाळीं—
घंटानादांत परततात
काळ्याभोर तुकतुकीत म्हशी
एखादी भोरी, एखादी चांदी
गवळी कानावर फेटा बांधलेला
डोक्यावर चारीची पेंढी
गौळण उभ्या अंगाची
भाळावर कुंकवाची ठसठशीत आडवी रेघ
रस्त्यालगत फुलांची गोंदण केलेली दाट हिरवळ
पुढें हिरवेंकाळेंशार अस्वली जंगल
उपरलच्या स्मशानांत जळत असतात
एकाच वेळीं :
दोन अनामिक प्रेतें
त्याचा वास...
तो एक आणि तो एक
एकमेकांना छेद देत पुढें सरकतात
'तूं जळतांना तुझासुद्धां असाच गड्या वास येईल !'
'निदान आपला धर्म बरा :
मेल्यावर आपण कांहीं जागा अडवत नाहीं !'

२.

उपरलच्या रस्त्यावरून खूपसे बैल आणि झालेलीं जनावरें
हाकाऱ्यापुढून मोन्यानें खुडूखडू जात असतात—
मृत्यूच्या दाढेंत—
गोव्याच्या खाटिकखान्यांत

जातांनाही हिरवळीवर चरत चरत जातात
ज्यांनीं धरती गरती केली आणि आपला घाम दिला
लाल लाल रक्त दिलें
तो एक त्याला म्हणतो,—
'माणूसहीं एरव्हीं रक्त शोषून जगत असतो'

३.

उपरलच्या नाक्यावर ग्रामदेवतेला परवां चिकार बळी दिले
न बोलणाऱ्या कोंबड्यांचे
सांज फाळत दिशापार गेलेलें त्यांचें केकाटणें
कातरवेळीं —
माझ्या खोल काळजांत कसें रुतून
परमेशा, प्रार्थना एवढीच,
माझ्या गाण्यांतील शब्दांची धुनी पेटूं दे !
त्या आर्त आरवांचीं स्वरकमळें
...गाण्यांतून उमलूं दे !

१००५८
२११६

४.

गेल्या पावसाळयांत या वळणावर प्रेमाचा पाऊस पाहिला
छोट्या, रंगीत छत्रीच्या आड
भर पावसांत—
त्यांच्या एकांताला माझीच झाली लाज
माझीच जाग
अजून ती होती केवळ लहान
'प्रेमसुद्धां जून झाल्याशिवाय जीव ओतून नाही होत'
म्हणतो तो
'प्रेम ! मानववंशाची एक सनातन तहान !'
म्हणाला, आणि तो एक

५.

ज्याच्याभोंवती मी चालतों आणि जो माझ्याबरोबर चालतो
तोच माणसें चालवतो
रस्ते केवळ निमित्तमात्र वाटतात
प्रत्येकाच्या पायाला असते गती—असते माती
जरी त्यांच्या ओठांवर कृष्ण, बुद्ध, ख्रिस्त
आणि तुकाराम असतो—
म्हणतो तो एक
जे भिंत तोडतात तेच ती घालतात
ती बर्लीनची असो वा चीनची
जें जें शब्दरूप तेवढेंच जिवंत
मी सुद्धां; जेव्हां जेव्हां कविता लिहितों
तेव्हां; आणि तेव्हांच फक्त जिवंत असतों !

६.

व्यास, ज्ञानेश्वर, तुकाराम, जनाई यांनीं शब्दांत देव पकडला
शेक्सपिअरनें शब्दांतून माणसांना आकार दिला
गांधी आणि मार्टिन ल्यूथर किंग यांनीं वळवला माणूस
तोच अंगावर आला अंतीं
आइन्स्टाइनला दिसला तोही प्रकाशच
समाकाश मानवी प्रज्ञेचा
आम्ही या प्रज्ञेनें चंद्र खणून आणतों तरीही
आमच्या हातीं माती कां ?
या प्रश्नाचें उत्तर मला हवें आहे...
'लॉटरी फुटून याचें उत्तर नाही मिळणार दोस्त,
मातीच्या जिवंत मूर्तीही होतात एवढें मात्र
विसरूं नकोस'
म्हणतो तो एक

सावंतवाडी १-१०-६९

REFBK-0018846
REFBK-00188

मराठी ग्रंथ संग्रहालय ठा
दा. क. १८८४६